| | |
|---|---|
| MHJN020005472013 | नियमित दिवाणी दावा क्र.२२१/२०१३<br>निलावती व इतर वि. शासन व इतर<br>CNRMHJN020005472013 |

## <u>निशाणी क्रमांक ८६ वरील आदेश</u>

सदरचा अर्ज वादींतर्फे महत्वाची कागदपत्रे दाखल करुन पुराव्यात वाचण्याची परवानगी मिळणेकामी दिला आहे.

२) अर्जातील कथने थोडक्यात पुढील प्रमाणे –

वादींतर्फे पुराव्याकामी संबंधीत महत्वाची कागदपत्रे सादर केली आहेत. सदर करारनाम्याची कागदपत्रे दाखल करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे सदर कागदपत्रे दाखल करुन पुराव्यात वाचण्याची परवानगी वादींनी मागितली आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३) प्रतिवादी क्र.१ ते ५, ७ व ९ तर्फे अर्जास कोणतेही म्हणणे दिलेले नाहीत. त्यामुळे अर्ज त्यांचे म्हणणे शिवाय चालविण्यात येत आहे. प्रतिवादी क्र.६ व ८ तर्फे सदर अर्जास अर्जावरच आपले म्हणणे दिले आहे. कागदपत्रे उशीराने सादर केली आहेत. सादर केलेली कागदपत्रे स्थळप्रती आहेत. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४) वादीं व प्रतिवादी क्र.६ ते ८ तर्फे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) दाव्याचे अभिलेखानुसार दावा वादींच्या पुराव्याकरिता नेमलेला आहे. वादींतर्फे पुराव्याकामी महत्वाची कागपत्रे सादर केली आहेत. सदर कागदपत्रे दाखल करुन पुराव्यात वाचण्याची परवानगी मिळणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. प्रतिवादी क्र.६ व ८ तर्फे अर्जास विरोध दर्शविताना सदर कागदपत्रे उशीराने सादर केली असून त्या स्थळप्रती आहेत.

६) वादींतर्फे वर्णन यादी निशाणी क्र.८६–अ नुसार सादर केलेले कागदपत्रांचे स्वरुप विचारात घेता सदर कागदपत्रे खाजगी स्वरुपाचे असून पुराव्याच्या कायदयानुसार थेट पुराव्यात वाचली जावू शकत नाहीत. याकरिता वादींतर्फे सादर केलेली कागदपत्रे केवळ दाखल करण्याची परवानगी देणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चाशिवाय अशंतः मंजुर करण्यात येत आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | सदरचा अर्ज खर्चाशिवाय अशंतः मंजुर करण्यात येत आहे. |
| २ | परिणामतः वादींतर्फे वर्णन यादी निशाणी क्र.८६–अ नुसार सादर केलेली कागदपत्रे केवळ दाखल करण्याची परवानगी देण्यात आहे. |

Digitally signed by NANDAKUMAR LAXMAN YEOLEKAR
Date: 2022.07.11 18:14:52 +0530

(एन. एल. येवलेकर)

दिनांकः ११/०७/२०२२

दिवाणी न्यायाधीश व.स्तर

जालना

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय (व.स्तर), जालना

दिनांक : ११/०७/२०२२

सही/-

एम. डी. आढे

लघुलेखक (ग्रेड-३)